महाराष्ट्र शासन (स्थापित)

फोन : २६०५४५१२
२६०५३२१५
फॅक्स : २६०५३२१५

# पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे

# PUNE DISTRICT SECURITY GUARD BOARD, PUNE

Constituted under Section 6 (1) of the Maharashtra Private Security Guards (Regulation of Employment and Welfare ) Act. 1981 (Mah. LVIII of 1981 )

स्थापना : २००३

Email : pdsgbpune@gmail.com, admin@PuneDistrictSecurityGuardBoard.in Web : www.punedistrictsecurityguardboard.in

**कार्यालय पत्ता : २९/२, शांतीकुंज, दुसरा मजला, सोमवार पेठ, पुणे - ४११ ०११.**

जा.क्र. पु.जि.सु.र.मं.पु. / 3004 दिनांक : 8/02/2021

प्रति,

विषय :- सुरक्षा रक्षकांच्या दि. ०१/०१/२०२१ पासून देय असलेल्या वाढीव महागाई भत्त्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मंडळाने पु.जि.सु.र.मं./वेतन/पुर्ननिर्धारण/ठ.क्र.९१/२०१९ अन्वये सुरक्षा रक्षकांचे वेतन पुर्ननिर्धारित केले आहेत. संबंधित आदेशात नमूद केल्याप्रमाणे दि.०१/०१/२०२१ ते दि.३०/०६/२०२१ या कालावधीसाठी विशेष भत्त्यांचा दर मंडळाने निर्धारित केलेला असून, सदरच्या आदेशाची प्रत सोबत जोडून देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ मधील कलम २३ अन्वये सुट मिळालेल्या सुरक्षा रक्षकांची वेतनांवरील ३% लेव्ही मंडळात ५ तारखेच्या आंत दरमहा अदा करावी.

आपला विश्वासु,

सरकारी कामगार अधिकारी
तथा
सचिव
पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे.

महाराष्ट्र शासन (स्थापित)

फोन : २६०५४५९२
२६०५३२९५
फॅक्स : २६०५३२९५

सु.र.मं.

स्थापना : २००३

# पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे

# PUNE DISTRICT SECURITY GUARD BOARD, PUNE

**Constituted under Section 6 (1) of the Maharashtra Private Security Guards (Regulation of Employment and Welfare ) Act. 1981 (Mah. LVIII of 1981 )**

Email : pdsgbpune@gmail.com, admin@PuneDistrictSecurityGuardBoard.in Web : www.punedistrictsecurityguardboard.in

**कार्यालय पत्ता : २९/२, शांतीकुंज, दुसरा मजला, सोमवार पेठ, पुणे - ४११ ०११.**

जा.क्र. पु.जि.सु.र.मं.पु. /

दिनांक :

## आदेश

विषय :- पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा महागाई भत्ता दिनांक ०१ जानेवारी, २०२१ पासून करण्यात येणारी सुधारणा.

पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांचे वेतन भत्ते व इतर सेवा शर्ती पुर्ननिर्धारित ठराव क्र. ९१/२०१९ अन्वये निर्धारित केलेले आहे. मंडळाचे दि.१५/०६/२०१९ रोजीच्या आदेशान्वये दि. १ एप्रिल, २०१९ पासून वेतन व भत्ते पुर्ननिर्धारित करण्यात आलेले आहे.

मंडळाने दि.०१/०४/२०१९ रोजी सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते पुर्ननिर्धारित करतांना शासनाने 'दुकाने व व्यापारी आस्थापना' या अनुसुचित उदयोगासाठी वेळोवेळी जाहिर केलेला विशेष भत्ता सुरक्षा रक्षकांना लागू केलेला आहे. मंडळाने दि. ०१/०७/२०२० ते दि.३१/१२/२०२० या कालावधीत जाहिर केलेला विशेष भत्ता रू.९३६/- इतका लागू केलेला होता. शासनाच्या सक्षम प्राधिकारी यांच्या दि. ०५/०२/२०२१ रोजीच्या क्र. ग्रा.वि./कि.वे.अ./वि.भ./२०२१(१)/कार्या-१०/९२० अधिसुचनेनुसार "कोणत्याही दुकानांतील व व्यापारी आस्थापनेतील कामधंदा" या अनुसुचित उद्योगातील कामगारांचे दि.०१/०१/२०२१ ते दि.३०/०६/२०२१ या कालावधींसाठी विशेष भत्त्यांचे दर रू.१०९२/- इतके निर्धारित करण्यात आलेले आहे.

मंडळाने दि.०७/०६/२०१९ रोजी केलेल्या ठराव क्र.९१/२०१९ नुसार केलेल्या वेतन पुर्ननिर्धारण आदेशात नमूद केल्याप्रमाणे उक्त नमूद अधिसुचना क्र. ग्रा.वि./कि.वे.अ./वि.भ./२०२१(१)/कार्या-१०/९२०, दि.०५/०२/२०२१ प्रमाण मानून दि.०८/०२/२०२१ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्त्यांत रू.१०९२-९३६ = रू.१५६ वाढ करून दि.०१ जानेवारी, २०२१ ते दि. ३० जून, २०२१ या कालावधीकरीता दरमहा रू.५,०२८ + रू.१५६ = रू.५,१८४/- इतका निश्चित करून जाहिर करण्यात येत आहे.

(निखिल अ. वाळके)
सहायक कामगार आयुक्त, पुणे
तथा
अध्यक्ष
पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, पुणे.